अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

दि.२१ फेब्रुवारी, २०१७ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका २०१७ घेण्यात येणार आहेत, हे आपणास विदित आहेच. सदर निवडणुकांच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी दि.०५/०२/२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर जिल्हा, मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ व अन्य अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मतदानाविषयी जागृती करण्यासाठी मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर जिल्हा, मा.डेप्युटी सी.ई.ओ., जिल्हा परिषद, कोल्हापूर व मा.कुलसचिव दि.१७/०२/२०१७ रोजी सकाळी ठिक ०९.०० वाजता वेबकास्टिंगद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या प्रक्षेपणासाठी महाविद्यालयांनी त्यांच्याकडील सभागृहामध्ये इंटरनेट सुविधेसह एक अद्ययावत संगणक एलसीडी/डीएलपी सुविधेसह उपलब्ध करून घ्यावा. दि.१७/०२/२०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता पुढील वेबलिंकवर क्लिक करून सदर कार्यक्रमाचे एलसीडी स्क्रीनवर प्रक्षेपण करावे. : www.cloud-india.com/live

या कार्यक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, प्रशासकीय सेवक तसेच समाजातील सर्व घटकांना समाविष्ट करून घ्यावे. तसेच सदर दिवशी अनुपस्थित असणा-या विद्यार्थ्यांसाठी दि.१८/०२/२०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता सदर कार्यक्रमाचे पुन:प्रक्षेपण करावे आणि दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमांचा फोटोसहीत अहवाल zpelection२०१७@unishivaji.ac.in तसेच affiliation.t२@unishivaji.ac.in या ई-मेलआयडीवर सत्वर पाठवावा. विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांनी मतदान जागृती अभियानाविषयीचे सदर प्रक्षेपण आयोजित करून सर्व मतदारांना प्रोत्साहित करावे.

कळावे,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/207
दि. 16 FEB 2017

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्न पारंपारिक महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.